# Cleanliness Activities

Cleanliness activities were conducted in Latur city, College Campus , adopted village and the villages where special camps were conducted (Mauje Bokramba, Kasargaon, Wagholi). These activities were also conducted in the Latur City at different social spaces, hospitals, Educational Institutes etc. These activities includes removal of garbage from organization of rallies, awareness about the cleanliness, etc.

**संत गाडगेबाबा स्मृतिदिनानिमित्त स्वच्छता अभियान : (दि. २० डिसेंबर २०१८)**

दि. २० डिसेंबर २०१८ रोजी महाविद्यालयातील रासेयो विभागाच्या वतीने गाडगेबाबांची पुण्यतिथी साजरी करून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या वेळी रासेयो स्वयंसेवकांनी महाविद्यलयातील वर्ग खोल्यांची स्वच्छता करत गाडगे बाबांच्या स्मृतिदिवस साजरा केला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ई.यू.मासूमदार, डॉ. ए.जे. राजू, उपप्राचार्य प्रा. विलास कांबळे, पर्यवेक्षीका प्रा. सुचिता वाघमारे, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ.पी.जी.कावळे, प्रा. व्ही.ए. गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक आणि विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



**स्वच्छता अभियान व श्रमदान : २९ डिसेंबर २०१८ ते ०४ जानेवारी २०१९**

शिबिरातील स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधिकाऱ्यांनी मौजे कासारगाव ता.जि. लातूर येथील जि.प. कें. शाळा, चौक व गावातील वेगवेगळया अनेक गल्ल्या व मुख्य रस्ता असलेला परिसर स्वच्छ केला. उघड्यावर शौचास बसू नये याकरिता गावात फेरी काढून स्वच्छतेचा संदेश दिला. गावातील वेगवेगळ्या ग्रामस्थांना सुलभ शौचालयासाठी २० त २५ शोष खड्डे खोदून देण्यात आले.

विविध ठिकाणी रस्त्याच्या कडेला साठलेला केरकचरा काढून परिसर स्वच्छ करण्यात आला. गावातील विविध भागात शिबिरार्थी स्वयंसेवकांनी गटारींची स्वच्छता करून शौचालयाचे व आंघोळीचे पाणी तुंबणार नाही याची दक्षता घेतली. ठिकठिकाणी तयार झालेले खड्डे मुरूम टाकून बुजविण्यात आले व ग्रामस्थांच्या सहकार्यातून या कार्यास मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे या कामात शिबिरार्थी स्वयंसेवकांनी भरीव योगदान दिले.

